नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 15/10/2020 (गुरूवार)
(दुपार)

## खून करणाऱ्या आरोपीतांना अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कारवाई

फिर्यादी नामे– कु रेखा शामराम ढोणे, वय 25 वर्ष, रा. वार्ड 04 खापरखेडा हिने पो. स्टे. खापरखेडा येथे रिपोर्ट दिला की, तिचा लहाण भाऊ मृतक नामे– अश्विन शामराव ढोणे, वय 24 वर्ष, रा. वार्ड 04 खापरखेडा हा दिनांक 14/10/2020 चे 17.00 वा. ते 18.00 वा. सुमारास त्याचा मित्र नामे– पवन इवनाते याच्यासह आरोपी नामे क्र. 1) शुभम राजेंद्र पाटील, वय 25 वर्ष, रा. चनकापुर याचे घरी जावून व ते आपसात बोलुन शिवनगर येथील ग्राउंडवर आले. त्यानंतर यातील आरोपी नामे क्र. 1) शुभम पाटील, 2) केशव उर्फ सोनु ओमबहादुर थापा, वय 22 वर्ष, 3) तुशार उर्फ शुटर प्रमोद नारनवरे, वय 19 वर्ष, रा. चनकापुर व वय 17 वर्षीय विधीसंघर्षग्रस्त बालक सर्व रा. चनकापुर यांनी आपसात संगणमत करुन कोणत्यातरी अज्ञात कारणावरून अश्विन ढोणे याच्या अंगावर तीक्ष्ण हत्याराने वार करून व गळा कापुन त्याला जिवानीशी ठार मारून सदर आरोपी यांनी घटनास्थळा वरून पळ काढला.

अश्या मिळालेल्या माहिती वरून स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण चे पथक हे पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत सदर गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असतांना त्यादरम्यान माहिती मिळाली की, आरोपी नामे– 1) शुभम राजेंद्र पाटील, वय 25 वर्ष, रा. चनकापुर, 2) केशव उर्फ सोनु ओमबहादुर थापा, वय 22 वर्ष, 3) तुषार उर्फ शुटर प्रमोद नारनवरे, वय 19 वर्ष, रा. चनकापुर व वय 17 वर्षीय विधीसंघर्षग्रस्त बालक सर्व रा. चनकापुर हे पाईप लाईन नांदा जवळ लपून असलेले आहेत. त्यावरुन आरोपीतांना घेरावबंदी करून व सापळा रचुन दिनांक 14/10/2020 चे 23.30 वा. ताब्यात घेवुन पुढील तपास कामी पो. स्टे. खापरखेडा यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 302, 34 भादंवि. सहकलम 4/25 भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून दि. 20/10/2020 पर्यंत पीसीआर मध्ये आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. चंद्रकांत काळे 8888803650 हे करीत आहे.

सदर कार्यवाही श्री. राकेश ओला, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, श्री. राहुल माकणीकर, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, पोउपनि श्री सचिन मत्ते, सफौ लक्ष्मीप्रसाद दुबे, पोहवा विनोद काळे, पोना अरविंद भगत, सत्यशील कोठारे, शैलेश यादव, चालक नायक पोलीस अमोल कुथे, पो शि प्रणय बनाफर, विरेन्द्र नरड, बालाजी साखरे, रोहण डाखोरे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर